जा.क्र.शेमासे/मा.सूचना/२४-२५/ ११५ /२०२४
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५
दि. १४/०६/२०२४

प्रति,

1. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)
2. प्रकल्प संचालक (आत्मा) (सर्व)
3. कृषी विकास अधिकारी, (जिल्हा परिषद) (सर्व)

**विषय - शेतकरी मासिक योजना सन २०२४-२५ साठी लक्षांक व मार्गदर्शक सूचना....**

सन १९६५ पासून कृषी विभागामार्फत शेतकरी मासिक शेतकऱ्यांच्या सेवार्थ दरमहा प्रसिध्द करण्यात येत असून या मासिकामध्ये कृषी विद्यापीठाचे तज्ञ आणि कृषी व संलग्न खात्याचे अधिकारी यांचे लेख तसेच कृषी क्षेत्रात काम करणा-या संस्था आणि कृषी क्षेत्रातील प्रगतीशील शेतकरी यांच्या यशोगाथा प्रसिध्द करण्यात येतात. बदलत्या काळाची गरज ओळखून शेतीसंबंधी इतर पूरक व्यवसाय, बाजार व्यवस्थापन, कृषीप्रक्रिया, निर्यातक्षम शेतीसाठी महत्त्वाचे निकष, राष्ट्रीयकृत बँकांमार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा/मदती बाबतची माहिती तसेच कृषी व संलग्न विभागाच्या विविध योजना इत्यादी माहिती प्रसिध्द करण्यात येते. राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, कृषीविषयक झालेले संशोधन वेळोवेळी या मासिकाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येते.

- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये शेतकरी मासिक या योजनेसंबंधीत विशेष सूचना

अ) लेख/लेखन/बातम्या/यशोगाथा/शिलेदार :

१. शेतकऱ्यांमधून उत्कृष्ट लेखक तयार करणे :

शेती व्यवसाय करताना पारंपरिक शेती पध्दतीला नव्या तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतीतील उत्पन्न शास्त्रीय पध्दतीने वाढविणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रयोगाचे, अनुभवाचे बोल त्यांच्याच लेखणीतून इतर लाखो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांना शेतकरी मासिकामधून लेख लिहिण्यासाठी प्रवृत्त करावे.

२. लेख/बातम्या प्रसिध्द करणे :

शेतकरी मासिकामधून कृषी विद्यापीठांचे शास्त्रज्ञ, कृषी तज्ञ, विविध विभागांचे अधिकारी, कृषी पुरस्कार प्राप्त व प्रगतीशील शेतकरी इत्यादी मान्यवरांचे लेख प्रसिध्द केले जातात. याशिवाय कृषी विभागाचे मा.मंत्री महोदय, इतर सन्माननीय पदाधिकारी तसेच खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांचे उपस्थितीत क्षेत्रीय स्तरावर वेळोवेळी जे कृषी विषयक कार्यक्रम आयोजित केले जातात अशा कार्यक्रमांची माहिती कृषीवार्ता व बातम्यांच्या बांधावर या सदरातून प्रसिध्द करण्यासाठी अशा बातम्या छायाचित्रांसह संपादक, शेतकरी मासिक यांचेकडे पाठवाव्यात. प्रगतीशील शेतकरी तसेच नाविन्यपूर्ण कामे करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अनुभवांचा इतर शेतकऱ्यांना उपयोग व्हावा, या दृष्टीने यशोगाथा या सदराखाली अशा शेतकऱ्यांच्या कार्याला प्रसिध्दी दिली जाते. तसेच खात्यातील अधिकारी / कर्मचारी यांनी आपल्या अनुभवावर आधारित मार्गदर्शनपर कृषी विषयक लेख/यशोगाथा पाठविल्यास त्यांनाही वेळोवेळी प्रसिध्दी देण्यात येते. या संदर्भातील उपयुक्त माहिती शेतकरी मासिक कार्यालयास ज्या महिन्यात प्रसिद्ध करावयाची आहे,

त्यापूर्वीच्या महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माहिती पी.डी.एफ तसेच वर्ड फाईल व छायाचित्रांसह (२००-३०० मेगापिक्सेलच्या रिझोल्युशनचे) पाठविण्यात यावी. यासाठी शासनाने शेतकरी मासिकातील लेखांसाठी रुपये १०० /- प्रति छापील पान याप्रमाणे लेखकांसाठी मानधन निश्चित केले आहे.

**३. नवीन योजना/ कार्यक्रम/ अभियान बाबत लेख :**

जिल्हयात नवीन योजना/अभियान आधारित कार्यक्रम राबविण्यात आले असल्यास त्याआधारे लेख तयार करून संपादक, शेतकरी मासिक कृषी आयुक्तालय, पुणे या कार्यालयास त्वरित पाठवावेत.

**४. यशोगाथा प्रसिध्द करणे :**

कृषी विभागामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जातात. योजनांच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात/उत्पन्नात विशेष वाढ होते. त्याचप्रमाणे योजनांच्या माध्यमातून वैयक्तिक शेतकऱ्यांच्या सामाजिक/आर्थिक जीवनात सकारात्मक बदल घडतात. अशा राबविलेल्या उपक्रमांच्या यशोगाथा आपल्या स्तरावरुन शेतकरी मासिकात प्रसिध्दीसाठी पाठविण्यात याव्यात. जेणेकरून इतर शेतकऱ्यांना त्यातून प्रेरणा मिळेल तसेच त्यातून शेतकरी मासिकाचा उद्देश सफल होईल. प्रत्येक जिल्हयातून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी तसेच प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी दरमहा किमान एक यशोगाथा शेतकरी मासिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवावी. यशोगाथा पाठवताना ज्या क्षेत्राची यशोगाथा आहे त्याठिकाणी कृषी विभागाने कोणकोणती कामे घेतली व त्याचा सामाजिक व आर्थिक बदलांवर काय परिणाम झाला, याचे आकडेवारीसह विश्लेषण पाठविण्यात यावे.

**५. कृषी विभागाचे शिलेदार :**

कृषी विभागात उत्कृष्ट काम करणारे दोन अधिकारी/कर्मचारी यांना त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबददल कृषी विभागाचे शिलेदार म्हणून प्रत्येक अंकात प्रसिध्दी देण्यात येते जेणेकरुन त्यांनी केलेले चांगले काम इतरांना मार्गदर्शक ठरेल व खात्यातील इतर अधिकारी/कर्मचारी यांना चांगल्या कामासाठी प्रोत्साहन मिळेल. प्रत्येक विभागातून प्रतिमहा किमान एक शिलेदाराची माहिती प्रसिध्दीसाठी देण्यात यावी.

**ब) शेतकरी मासिकासाठी वर्गणीदार करणे -**

१. राज्यातील व राज्याबाहेरील कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही महिन्यापासून शेतकरी मासिकाचा वर्गणीदार होता येते. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व **योजनामधील लाभार्थी शेतकऱ्यांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करणे अनिवार्य आहे.** तसेच ग्रामपंचायती, पंचायत समित्या/जिल्हा परिषद, सहकारी सोसायट्या, खाजगी फळरोपवाटिका, खाजगी माती परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खते व कीटकनाशके उत्पादक कंपन्या, कृषी चिकित्सालये, कृषी वाचनालये, कृषी विज्ञान मंडळे, समूह शेती/गटशेतीतील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी दूध संस्था, साखर कारखाने सभासद, कृषी संलग्न विभाग, बाजार माहिती केंद्र, कृषी उत्पन्न बाजार समिती, सार्वजनिक वाचनालय, महिला स्वयंसहाय्यता बचत गट तसेच जास्तीतजास्त शेतकऱ्यांना या मासिकाचे वर्गणीदार करून घ्यावे. एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रात्यक्षिके, पीक उत्पादन वाढ प्रात्यक्षिके, फळबाग लागवड, बीजोत्पादन कार्यक्रम, कृषीप्रक्रिया उद्योग, जलसंधारण कामे, रामेती व सामेतीमध्ये (वनामती) प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी, कृषी विभागाचे क्षेत्रिय तांत्रिक कर्मचारी, शेतकरी प्रशिक्षण, कृषी प्रदर्शने, चर्चासत्रे, शेतकरी अभ्यास दौरे, केंद्र पुरस्कृत

यांत्रिकीकरण योजना, हरितगृह योजना, ठिबक व तुषार सिंचन योजना इ. योजनांचे तसेच विविध अभियानातील उपक्रमांचा लाभ घेणारे लाभार्थी यांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करून घ्यावे. प्रक्रिया केंद्रे, रासायनिक व सेंद्रिय खत उत्पादक, बियाणे उत्पादक आणि विक्रेते यांनाही व्दिवार्षिक वर्गणीदार करून घ्यावे. महत्वाचे म्हणजे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी स्वत: आपल्या जिल्हयातील सर्व सहकारी साखर कारखान्यास भेट देवून साखर कारखान्यांच्या सर्व सभासदांना 'शेतकरी मासिकाचे' वर्गणीदार करून घेण्यासंदर्भात उचित कार्यवाही करावी.

**२. ग्रामपंचायतीस वर्गणीदार करणे :**

सर्व ग्रामपंचायतीना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करुन घेण्यासाठी ग्रामविकास विभागाने शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-२६०२/प्र.क्र./१८५८/२२ दि. १८.०९.२००२ अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. गावपातळीपर्यंत पोहोचणाऱ्या शेतकरी मासिकाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातील नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, शासनाच्या विविध योजना, कृषी क्षेत्रातील लक्षवेधक घडामोडी तसेच कृषी व संलग्न व्यवसाय व बँकांकडील माहिती शेतकऱ्यांपर्यंत माफक किमतीमध्ये पोहोचविण्यात येत आहे. या दृष्टिकोनातून प्रत्येक ग्रामपंचायतीस शेतकरी मासिक प्राप्त होणे आवश्यक आहे. कृषी विकास अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरून प्रत्येक ग्रामपंचायतीस, ज्या गावात ग्रामपंचायत नसेल तेथील सार्वजनिक वाचनालयास शेतकरी मासिकाचे नियमित वर्गणीदार करून घ्यावे.

**३. कृषी प्रदर्शने, चर्चासत्रे व मेळावे :**

क्षेत्रीय कार्यालये, जिल्ह्याचे मुख्यालय तसेच आपले कार्यालयात शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करण्याचे दृष्टीने दर्शनीय ठिकाणी सूचनाफलक लावावा. विविध स्तरावर शेतकरी मेळावे, कृषी प्रदर्शने, धान्य व फळ महोत्सव, प्रशिक्षण कार्यक्रम तसेच चर्चासत्रे मोठ्या प्रमाणावर आयोजित केली जातात. सदरील कार्यक्रमात शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. कृषी विभागातील स्थानिक कार्यालये अशा प्रदर्शनामध्ये सहभागी होतात. अशा ठिकाणी शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करुन घेणे व अंक विक्री करण्यासाठी स्थानिक स्तरावरच व्यवस्था करावी. त्यासाठी शासकीय पावती पुस्तके संबंधित कार्यालयाकडीलच वापरावीत. विक्रीसाठी लागणारे अंक मागणीप्रमाणे आयुक्तालय स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येतील. मात्र ऐनवेळी अडचणी येऊ नयेत; म्हणून अशावेळी जादा अंकाची मागणी एक महिना आधी नोंदवून संबंधितांनी संपादक, शेतकरी मासिक या कार्यालयाकडून घेऊन जावीत. जमा झालेली रक्कम मुद्या क्र. "क" मध्ये दिलेल्या लेखाशिर्षाखाली स्थानिक कोषागारात अथवा GRAS प्रणालीव्दारे भरुन वर्गणीदारांची यादी मूळ चलनासह शेतकरी मासिक कार्यालयास पाठवावी त्यानंतर वर्गणीदार करुन घेऊन अंक नियमित पाठविण्यात येतील.

**४. कृषीसेवा केंद्र :**

कृषीसेवा केंद्रामार्फत खते, बियाणे व औषधे यांची विक्री केली जाते. शेतकरी मासिकामध्ये हंगामनिहाय पिके/फळपिके लागवड तंत्रज्ञान, बियाणे संबंधित माहिती तसेच कीड व रोग या संबंधित माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्या आधारे कृषीसेवा केंद्रांमार्फत शेतकऱ्यांना माहिती पुरविणे सोयीस्कर आहे. त्यासाठी कृषी विकास अधिकारी यांनी त्यांचे जिल्ह्यातील सर्व कृषीसेवा केंद्रांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करून घ्यावे.

५. आत्मा अंतर्गत व स्मार्ट प्रकल्पांतर्गत तयार होणाऱ्या गटांना/ शेतकरी उत्पादक कंपन्यांना वर्गणीदार करणे :

कृषी विभागातील आत्मा, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान तसेच इतर अभियान/योजनातंर्गत शेतकरी समूह गट, शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन केल्या जातात. या शेतकरी समूह गटास शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करून त्या गटांना/कंपन्यांना शेतकरी मासिकामार्फत आधुनिक तंत्रज्ञान पोहचविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनाही वर्गणीदार करून घ्यावे.

६. जिल्हानिहाय वर्गणीदार करण्यासाठीचे लक्षांक :

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी प्रत्येक तालुक्यासाठी एकूण ४०० शेतकरी मासिकाच्या वर्गणीदारांचा लक्षांक निर्धारित केला असून (जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - प्रति तालुका २००,कृषी विकास अधिकारी - प्रति तालुका १०० व प्रकल्प संचालक, आत्मा - प्रति तालुका १००) त्यापैकी जिल्हा स्तरांवरून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी जिल्हयातील तालुक्यांच्या संख्येनुसार वर्गणीदार करण्याचे लक्षांक ठरवावे. विविधस्तरावर काम करणारे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच राज्यातील शेतकरी कुटुंबांची संख्या विचारात घेता संबंधित जिल्ह्यांना वर्गणीदार करण्याचे दिलेले लक्षांक अत्यंत माफक आहे. सोबत सहपत्रित केलेल्या **प्रपत्र-३** मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी एकूण लक्षांकाच्या ५० टक्के, कृषी विकास अधिकारी यांनी २५ टक्के आणि प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी २५ टक्के या प्रमाणात शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करण्याचे वार्षिक लक्ष्यांक निश्चित केले असून त्याप्रमाणात ते साध्य करण्याची कार्यवाही करावी.

सन २०२४-२५ या वर्षात जिल्हास्तरावर होणाऱ्या विविध कृषी प्रदर्शन, कृषी महोत्सवामध्ये शेतकरी मासिकाचे कमीत कमी १००० वर्गणीदार करण्यात यावेत, तसेच कृषी विभागातील सर्व तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांनाही वर्गणीदार करण्यात यावे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे सभासद, द्राक्ष बागायतदार संघाचे सभासद, डाळिंब संघ तसेच इतरही फळ उत्पादक संघांच्या सभासदांना इ. सर्वांना मासिकाचे वर्गणीदार करण्यात यावे. जे कृषी सहाय्यक १०० पेक्षा जास्त वर्गणीदार करतील त्यांना राज्यस्तरावरुन प्रशस्तीपत्रक देण्यात येईल. तसेच तालुकास्तरीय अधिकारी १००० पेक्षा जास्त वर्गणीदार करतील त्यांनाही राज्यस्तरावरुन प्रशस्तीपत्रक देण्यात येईल.

क) मासिकाची वर्गणी :

शेतकरी मासिकाची वार्षिक वर्गणी रूपये ४००/- तर द्विवार्षिक वर्गणी रूपये ८००/- असून किरकोळ अंकाची किंमत रूपये ३५/- एवढी आहे. **मासिकाची वार्षिक व व्दिवार्षिक वर्गणी रक्कम शेतकरी मासिक कार्यालयात रोखीने भरता येणार नाही.** वर्गणीची रक्कम क्षेत्रीय कार्यालयाकडून कोषागार चलनाने किंवा ग्रास प्रणालीमार्फतच स्वीकारली जाते. तसेच वैयक्तिक शेतकरी वर्गणी मनीऑर्डरव्दारे शेतकरी मासिक कार्यालयास पाठवू शकतात. सन २०१३-१४ या वर्षापासून संगणकीय **ग्रासप्रणालीतून** (Government Receipts Accounting System- GRAS) महसूल जमेची

रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरण्याची कार्यपध्दती विकसित करण्यात आली आहे. ऑनलाईन पध्दतीने वर्गणी भरताना पुढील प्रमाणे वर्गणी भरता येते.

1. Internet Banking (नेट बँकिंग) अथवा डेबीट व क्रेडीट कार्ड मार्फत
2. Accross Bank Counter :- सर्व बँक चलन, चलन बँकेत भरायचे असल्यास पर्याय निवडावा.
3. UPI ने भरायचे असल्यास UPI ID टाकून वर्गणी भरता येईल. उदा. Phone Pay, Google Pay

त्यानुसार वर्गणीदारांनी GRAS प्रणालीव्दारे वर्गणी भरणा करून चलनाची प्रत व पत्त्यांची यादी पिनकोडसह शेतकरी मासिक कार्यालयास agrishetkari@gmail.com या ईमेल-आयडी वर अथवा पोस्टाने (पत्रव्यवहारामाठी कार्यालयाचा पत्ता - शेतकरी मासिक, समिती सभागृह, दूसरा मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५) पाठवावी. सदर चलनाची प्रत व यादी शेतकरी मासिक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर नवीन वर्गणीदारांना सभासद क्रमांक दिला जाईल. अंकाबाबत कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना संबंधित वर्गणीदाराने त्यांचा सभासद क्रमांक व वर्गणीचा कालावधी नमूद करणे आवश्यक राहील, तसेच कोषागार चलनाची मुळप्रत पाठविणे आवश्यक आहे. कृषी विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना पुढील लेखाशिर्षाखाली कोषागारात वर्गणी जमा करुन शेतकऱ्यांना वर्गणीदार करुन घेता येईल. वर्गणीदार होण्यासाठी शेतकरी मासिक अंकाच्या मलपृष्ठावरील QR कोड Scan करा.

*कृषी विभाग, 0401 पीक संवर्धन,*

*800 इतर जमा रकमा,*

*(01) (01) शेतकरी मासिक, (04010114) (0401034801)*

**वर्गणीदारांच्या पत्त्यांच्या याद्या -**

वर्गणीदारांचे पत्ते सुवाच्छ अक्षरात आणि पिनकोड घालून पाठविण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर अंक प्राप्त होत नाहीत व अंक परत येण्याचे प्रमाण वाढत आहे. हे टाळण्यासाठी **संबंधितांनी वर्गणीदारांचे संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता व पिनकोड क्रमांक, संपर्क फोन नंबर याबाबतची माहिती संगणकीकृत अगर सुवाच्छ अक्षरात लिहून पाठवावयाची दक्षता घ्यावी.**

ड) जाहिरात -

१) शेतकरी मासिकासाठी जाहिराती स्वीकारणे:

शेतकरी मासिकामध्ये <u>शासकीय स्वरुपाच्या जाहिराती</u> स्विकारण्यात येतील. प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत जाहिराती प्राप्त झाल्यास पुढील महिन्याच्या अंकामध्ये प्रसिद्धीसाठी सदरच्या जाहिरातींचा समावेश करण्यात येईल. तसेच जाहिरात देण्यापूर्वी शेतकरी मासिक कार्यालयास (०२०-२५५३७३३१) या दूरध्वनीवर संपर्क साधावा. जाहिरातीचे आर्टवर्क आकारानुसार पी.डी.एफ. फॉरमॅट मध्ये agrishetkari@gmail.com या इ-मेल वर पाठवावे. शासनाने शेतकरी मासिकामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे दर निश्चित केले असून त्याची दरसूची पुढीलप्रमाणे आहे.

जुलै २०११ पासून जाहिरातीचे मंजूर दर सदरची जाहिरात ही फक्त रंगीत स्वरुपात प्रसिध्द करण्यात येईल.

| अ.क्र. | जाहिरात पान | आकार ( सेंटीमीटर ) | सर्वसाधारण दर रूपये | करार दर रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मुखपृष्ठ क्र. ४ | १७.५ X१७.५ | २३,००० | २१,००० |
| २ | मुखपृष्ठ क्र.२ व ३ | २२.५ X १७.५ | २०,००० | १८,००० |
| ३ | आतील पृष्ठ अ) पूर्णपान | २२.५ X१७.५ | १७,००० | १५,००० |
| | ब) अर्धे पान | ११.२५ X १७.५ | ८,५०० | ७,५०० |
| | क) १/४ ( पाव पान) | ११.२५ X८.७५ | ४,२५० | ३,७५० |
| ४ | ओपनिंग पेज १ | २२.५ X १७.५ | २०,००० | १८,००० |
| | ओपनिंग पेज २ | २२.५ X १७.५ | १८,००० | १६,५०० |
| ५ | क्लोजिंग पेज २ | २२.५ X १७.५ | १८,५०० | १६,५०० |
| | क्लोजिंग पेज १ | २२.५ X १७.५ | २०,००० | १८,००० |
| ६ | मिडल कनेक्टेड पेज (एक पान) | २२.५ X १७.५ | २१,००० | दर करार नाही |
| ७ | मिडल कनेक्टेड डबल पेज(दोन पाने) | २२.५ X १७.५ | ४०,००० | दर करार नाही |

टिप- जाहिरात जर वर्षातील सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी दिली तरच करार दर लागू राहतील.

**मासिक प्रगती अहवाल:**

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषी विकास अधिकारी यांनी शेतकरी मासिकाचे केलेले वर्गणीदार व दिलेल्या जाहिराती बाबतची माहिती व मासिक प्रगती अहवाल सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात (प्रपत्र-१) विभागीय कृषी सहसंचालक यांचे मार्फत आयुक्तालयास दरमहा १० तारखेपर्यत विनाविलंब सादर करण्याची व्यवस्था करावी. तसेच मासिक प्रगती अहवाल सादर करताना माध्याच्या आकडेवारी नुसार शेतकऱ्यांची यादी देखील (सविस्तर पत्त्यांसह) पाठविण्याची दक्षता घ्यावी.

कृषी संचालक,
**विस्तार व प्रशिक्षण**
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत-

१) मा. संचालक, वसंतराव नाईक कृषी व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
२) कृषी संचालक (सर्व) ..............................................................
३) संचालक संशोधन, कृषी विद्यापीठ (सर्व) ..........................................
४) संचालक विस्तार शिक्षण कृषी विद्यापीठ (सर्व)..................................
५) विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)..................................
६) प्राचार्य रामेती, प्रादेशिक कृषी व्यवस्थापन संस्था (सर्व)...........................
७) प्रमुख समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र (सर्व) .......................................
८) उपविभागीय कृषी अधिकारी ............................जिल्हा ..................
९) तालुका कृषी अधिकारी ................................जिल्हा ..................
१०) गटविकास अधिकारी, पंचायत समिती ................ जिल्हा .................

**प्रपत्र - १**

**मासिक प्रगती अहवाल प्रपत्र**

**शेतकरी मासिक सन २०२४-२५**
**माहे** ................
**दिनांक -**

| अ. क्र. | तालुका | वर्गणीदार लक्षांक | मागील महिन्यापर्यंत साध्य | चालू महिन्यातील साध्य | एकूण साध्य | साध्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**ठिकाण:**
**दिनांक:**

स्वाक्षरी -
**जि.अ.कृ.अ./कृ. वि.अ./प्र.सं.(आत्मा)**

---

**प्रपत्र - २**

**शेतकरी मासिकाचे वर्गणीदार झाले बाबतचे प्रमाणपत्र** (वर्गणीदारास द्यावयाची पोच)

श्री. ...................................................... मु.पो. ............... ता. ............... जि. ..........पिनकोड क्र. ............. यांचेकडून शेतकरी मासिकाचे वार्षिक/ द्विवार्षिक वर्गणी पोटी रक्कम रु. .............. /- वर्गणी प्राप्त झालेले आहेत. प्राप्त रक्कम चलनाने कोषागारात भरुन आपणास वर्गणीदार करुन घेऊन अंक नियमित पाठविण्याबाबत संपादक, शेतकरी मासिक, कृषी आयुक्तालय, म.रा., कृषीभवन, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे - ५ यांचेकडे कळविण्यात येत आहे.

**स्वाक्षरी -**

**कार्यालयाचा पत्ता -**

**प्रपत्र - ३**

**सन २०२३-२४ मध्ये जिल्हानिहाय शेतकरी मासिक वर्गणीदारांचे वार्षिक लक्षांक**

| अ.क्र | जिल्हे | तालुके संख्या | जि.अ.कृ.अ. | कृ.वि.अ. | प्रकल्प संचालक (आत्मा) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ठाणे | ५ | १००० | ५०० | ५०० | २००० |
| 2 | पालघर | ८ | १६०० | ८०० | ८०० | ३२०० |
| 3 | रायगड | १५ | ३००० | १५०० | १५०० | ६००० |
| 4 | रत्नागिरी | ९ | १८०० | ९०० | ९०० | ३६०० |
| 5 | सिंधुदुर्ग | ८ | १६०० | ८०० | ८०० | ३२०० |
| ठाणे विभाग | | ४५ | ९००० | ४५०० | ४५०० | १८००० |
| 6 | नासिक | १५ | ३००० | १५०० | १५०० | ६००० |
| 7 | धुळे | ४ | ८०० | ४०० | ४०० | १६०० |
| 8 | जळगाव | १५ | ३००० | १५०० | १५०० | ६००० |
| 9 | नंदूरबार | ६ | १२०० | ६०० | ६०० | २४०० |
| नासिक विभाग | | ४० | ८००० | ४००० | ४००० | १६००० |
| 10 | अहमदनगर | १४ | २८०० | १४०० | १४०० | ५६०० |
| 11 | पुणे | १३ | २६०० | १३०० | १३०० | ५२०० |
| 12 | सोलापूर | ११ | २२०० | ११०० | ११०० | ४४०० |
| पुणे विभाग | | ३८ | ७६०० | ३८०० | ३८०० | १५२०० |
| 13 | सातारा | ११ | २२०० | ११०० | ११०० | ४४०० |
| 14 | सांगली | १० | २००० | १००० | १००० | ४००० |
| 15 | कोल्हापूर | १२ | २४०० | १२०० | १२०० | ४८०० |
| कोल्हापूर विभाग | | ३३ | ६६०० | ३३०० | ३३०० | १३२०० |
| 16 | औरंगावाद | ९ | १८०० | ९०० | ९०० | ३६०० |
| 17 | जालना | ८ | १६०० | ८०० | ८०० | ३२०० |
| 18 | वीड | ११ | २२०० | ११०० | ११०० | ४४०० |
| औरंगाबाद विभाग | | २८ | ५६०० | २८०० | २८०० | ११२०० |
| 19 | लातूर | १० | २००० | १००० | १००० | ४००० |
| 20 | उस्मानावाद | ८ | १६०० | ८०० | ८०० | ३२०० |
| 21 | नांदेड | १६ | ३२०० | १६०० | १६०० | ६४०० |
| 22 | परभणी | ९ | १८०० | ९०० | ९०० | ३६०० |
| 23 | हिंगोली | ५ | १००० | ५०० | ५०० | २००० |
| लातूर विभाग | | ४८ | ९६०० | ४८०० | ४८०० | १९२०० |
| 24 | अमरावती | १४ | २८०० | १४०० | १४०० | ५६०० |
| 25 | अकोला | ७ | १४०० | ७०० | ७०० | २८०० |
| 26 | वाशिम | ६ | १२०० | ६०० | ६०० | २४०० |
| 27 | बुलढाणा | १३ | २६०० | १३०० | १३०० | ५२०० |
| 28 | यवतमाळ | १६ | ३२०० | १६०० | १६०० | ६४०० |
| अमरावती विभाग | | ५६ | ११२०० | ५६०० | ५६०० | २२४०० |
| 29 | नागपूर | १३ | २६०० | १३०० | १३०० | ५२०० |
| 30 | वर्धा | ८ | १६०० | ८०० | ८०० | ३२०० |
| 31 | भंडारा | ७ | १४०० | ७०० | ७०० | २८०० |
| 32 | चंद्रपूर | १५ | ३००० | १५०० | १५०० | ६००० |
| 33 | गडचिरोली | १२ | २४०० | १२०० | १२०० | ४८०० |
| 34 | गोंदीया | ८ | १६०० | ८०० | ८०० | ३२०० |
| नागपूर विभाग | | ६३ | १२६०० | ६३०० | ६३०० | २५२०० |
| **एकूण महाराष्ट्र राज्य** | | **३५१** | **७०२००** | **३५१००** | **३५१००** | **१४०४००** |